वाचा १. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक- २४/१२/२०१३

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१

क्र.आसंप्रसं/अ.ग./का.४/२०१८/५३८ दिनांक- ३१/३/२०१८

## आ दे श

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या संस्थेस स्वायत्त संस्था म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार स्वायत्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची नोंदणी अधिनियम १८६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत पंजीबध्द करुन धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करण्यात आली आहे. त्या अंतर्गत Memorandum नुसार संस्थेची उदिष्टये ठरविण्यात आलेली आहेत. या उदिष्टानुसार योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन/सूचना करण्यासाठी खालील प्रमाणे विषय तज्ज्ञांच्या अभ्यास गटाची स्थापना आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ.किरण कुलकर्णी, भा.प्र.से. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २. | श्री.माधव गाडगीळ, पर्यावरण तज्ञ व वृक्षमित्र - वन व जैवविविधता व्यवस्थापन अभ्यास केंद्र याचे सदस्य | सदस्य |
| ३. | श्री.सुबोध कुलकर्णी, सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटीचे मराठी विकिपिडिया समन्वयक आणि वृक्षमित्र - वन व जैवविविधता व्यवस्थापन अभ्यास केंद्र याचे सदस्य | सदस्य |
| ४. | श्री.प्रल्हाद कचरे, से.नि.प्रबंधक, यशदा, | सदस्य |
| ५. | श्री.दिवाकर केसकर, कौशल्य विकास प्रशिक्षण तज्ञ | सदस्य |
| ६. | श्री.निरज हातेकर, संचालक मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई | सदस्य |
| ७. | श्रीमती सीमा जोशी, उपसंचालक (एक्षेविका), आ.संप्र.सं. पुणे | सदस्य सचिव |

सदर अभ्यास गटाने खालील विषया संदर्भात अभ्यास करुन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करावीत.

१. सामुहिक वन व्यवस्थापन प्रभावी होण्यासाठी आवश्यक व लोकांना सहज उपलब्ध होईल असा सर्वंकष मुक्त माहितीस्त्रोत विकसीत करणे, यासाठी योग्य त्या स्वरूपाचे संकेतस्थळ व त्यावरील मजकुर युनिकोड मध्ये असणे.
२. संदर्भ म्हणुन वापरता येईल असे साहित्य, उदा:प्रशिक्षण पुस्तिका, पुस्तके, छायाचित्रे यांचे डीजीटायझेशन करून ते सर्चेबल स्वरूपात उपलब्ध करणे.

३. साधन व्यक्ती निर्देशिका (Resource Person Directory) तयार करणे.

४. आसंप्रसं, पुणे येथे स्थापित करण्यात आलेल्या वनमित्र कक्षांतर्गत करण्यात येणाऱ्या कामकाजाची प्रभावी अंमलबजावणी साठी रूपरेषा निश्चित करणे.

५. आदिवासीं कल्याणांच्या दृष्टीकोनातून अभ्यास करुन अभिनव प्रकल्प सुचविणे, त्याचे नियोजन व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक तत्वे तयार करणे.

६. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी, बेंचमार्क सर्वेक्षण, माहिती संकलन इ.विषयाबाबत सल्ला देणे

सदर अभ्यास गटाच्या आवश्यकतेनुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे बैठका घेण्यात येतील. ही बैठक महिन्यातून किमान एकदा आयोजित करण्यात येईल.

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत

१. श्री.माधव गाडगीळ,ए-१८ स्प्रिग फलॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८

२. श्री.सुबोध कुलकर्णी, १५५७, सिव्हील हॉस्पीटलसमोर, गणेशनगर, दुसरी गल्ली, दिगंबर मेडिकलची बाजू, ताराई कॉम्पलेक्स शेजारी, डी आर.कुलकर्णी यांचे घर, सांगली-४१६४१६

३. श्री.प्रल्हाद कचरे, फलॅट नं.६, निसर्ग अपार्टकमंट, वेदांतनगर, कर्वेरोड, पुणे

४. श्री.दिवाकर केसकर, फलॅट नं.८, बिल्डींग नं.१, सी-३, सिध्दार्थनगर, पुणे ७

५. श्री.निरज हातेकर, संचालक मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई

६. श्रीमती सीमा जोशी, उपसंचालक, एक्षेविका, आ.सं.प्र.सं. पुणे

७. स्वीय सहाय्यक, आयुक्त, आ.सं.प्र.सं. पुणे

८. कार्यालयीन नस्ती

D:\order coar committee rewise.docx